महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६५७ दि. २३/०५/२०२३

**विषय:- महावितरण कंपनीचे बदली धोरण - २०२३.**

**संदर्भ:-** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१४ दि.१०.०८.२०१५.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५४० दि.०३.०६.२०१६.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५७ दि.२०.०५.२०१७.
४) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७० दि.१९.०५.२०१८.
५) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०७ दि.०७.०८.२०२०.
६) पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.०५/बदली धोरण/१३७४२ दि.२७.०८.२०२०.
७) पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.०५/बदली धोरण/१५२०१ दि.१७.०९.२०२०.
८) परिपत्रक क्र. १७२६० दि.३०.०७.२०२१.
९) परिपत्रक क्र. १९९१७ दि.२६.०८.२०२१.

महावितरण कंपनीमध्ये विविध वेतनगटामधील पदांवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या कामाच्या स्वरूपात व कामाच्या मुख्यालयात वेळोवेळी बदल करून कर्मचाऱ्यांच्या ज्ञान, अनुभव व कुशलता मध्ये वाढ होण्यास व कर्मचाऱ्यांचे कौशल्य आणि व्यक्तिमत्व विकास होण्याकरिता आणि त्यांच्या अनुभवाचा सुयोग्य वापर कंपनीच्या दैनंदिन कामकाजात होण्याच्या दृष्टिकोनातून प्रशासकीय परिपत्रक क्र.५१४ दि.१०.०८.२०१५ अन्वये कंपनीचे बदली धोरण स्विकारण्यात आले आहे.

२. सद्यस्थितीत कंपनी अंतर्गत सर्व साधारण बदल्या व विनंती बदलीकरिता पात्र व इच्छुक अधिकारी व कर्मचारी यांच्या सन २०२३ करिता बदली संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे करिता सादर केलेल्या प्रस्तावास मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन), संचालक (वित्त), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन मंजूरी प्रदान केलेली आहे.

३. प्रशासकीय परिपत्रक क्र.५१४ दि.१०.०८.२०१५ अनुसार निर्गमित केलेले बदली धोरण व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या विविध सुधारणा/ बदल यामध्ये सन २०२३ करिता खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहेत :

क) प्रशासकीय परिपत्रक क्र.६०७ दि.०७.०८.२०२० अन्वये नव्याने अंगीकृत करण्यात आलेली अनिवार्य रिक्त पदांची **(Compulsory Vacancy-CV)** संकल्पना सन २०२३ च्या बदल्यांकरिता तात्पुरती स्थगित करण्यात येत आहे.

..२..

ख) सन २०२३ या वर्षाकरिता करण्यात येणाऱ्या बदल्यामध्ये सर्व साधारण बदल्या व विनंती बदल्या, या प्रत्येक पदाच्या एकुण कार्यरत कर्मचारी संख्येच्या जास्तीत जास्त २५% असतील. तसेच यामध्ये सर्व साधारण बदल्या व विनंती बदल्या सम प्रमाणात राहतील. संचालक मंडळाने दिलेल्या मंजूरीनुसार राज्यस्तरीय ज्येष्ठता यादीतील अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता दीर्घकाळ मुदतीच्या बदल्यांसाठी पात्रता निकष नव्याने निर्धारित केले आहेत. त्यानुसार ज्या अधिकारी व कर्मचारी यांची एकाच परिमंडळामध्ये १० वर्षे इतका कालावधी पूर्ण झाला असेल असे कर्मचारी परिमंडळाबाहेर व एकाच मंडळातील ३ वर्षे इतका कालावधी पूर्ण झाला असेल असे अधिकारी व कर्मचारी मंडळाबाहेर परंतु परिमंडळांतर्गत बदलीकरिता पात्र होतात. तथापि, सन २०२२ मध्ये बदली धोरण राबविले नसल्याने सर्व साधारण बदल्यांमध्ये उचित समन्वय साधण्यासाठी केवळ वर्ष २०२३ करिता उपरोक्त नमूद पात्रता निकषांमध्ये शिथिलता आणून प्रथम टप्प्यात एकाच परिमंडळात **२४ वर्षे ऐवजी सलग १८ वर्षे** व त्यापेक्षा अधिक कार्यकाळ पूर्ण केलेले अधिकारी व कर्मचारी परिमंडळाबाहेर बदलीकरिता पात्र ठरतील. वर्ष २०२३ करीता करावयाच्या वर्ग १ ते ४ मधील बदल्यांकरिता प्रशासकीय परिपत्रक क्र.५१४ दि.१०.०८.२०१५ मधील तद्अनुषंगीक तरतुदी लागू राहतील.

ग) सर्व साधारण बदल्या व विनंती बदल्यांकरिता एकुण कालावधीची गणना करताना **दि.३१.०५.२०२३** पर्यंतचा सेवाकालावधी धरण्यात यावा. सर्व साधारण बदलीकरिता सलग कार्यकालाची परीगणना करीत असतांना, दुसऱ्या कार्यक्षेत्रातील एक वर्षापेक्षा कमी असलेला कार्यकाल विचारात घेतला जाणार नाही. तसेच पत्र क्र.१०५५५ दि.१२.०४.२०२३ मधील सूचनांनुसार दि.२५.०४.२०२३ किंवा तद्पुर्वीचे संगणकीय प्रणालीतील विनंती बदलीचे अर्ज ग्राहय धरले जातील.

घ) मंडळ व विभागीय सेवाजेष्ठता यादीतील कर्मचाऱ्यांची बदली करते वेळी संबधीत भरती प्रकारासाठी उपलब्ध अनुषेशाची पदे विचारात घेण्यात यावीत, जेणे करून बिंदूनामावली संबंधित अडचणी उद्भवणार नाहीत. सद्यस्थितीत न्यायालयीन निर्णयानुसार पदोन्नती कोट्यातील आरक्षण स्थगित ठरविल्यामुळे वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयाच्या आधीन राहून सर्व पदोन्नत्या खुल्या प्रवर्गा अंतर्गत होत असल्याने सन २०२३ करीता पदोन्नतीच्या कोट्यातील (सरळ सेवा भरती व अंतर्गत अधिसूचना करीताचा राखीव कोटा वगळून) कर्मचाऱ्यांची बदली करते वेळेस प्रवर्ग निहाय अनुषेशाची उपलब्धता तपासणे बंधनकारक राहणार नाही.

च) जे खेळाडू Sportsman Quota अंतर्गत नियुक्त झालेले आहेत व ते अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या क्रीडास्पर्धेत किंवा राज्यस्तरीय स्पर्धेत कमीत कमी ३ वेळा सहभाग नोंदवतात अशा खेळाडूंना वयाच्या कमाल ४० वर्षापर्यंत शक्यतो जिल्हाच्या ठिकाणी पदस्थापना / विनंती बदली देण्यात यावी.

छ) पदोन्नतीपश्चात बदली झाल्यावर पदोन्नती नाकारण्याचे प्रमाण वाढले असल्यामुळे राज्यस्तरीय सेवाजेष्ठता यादीमधील ज्या अधिकाऱ्यांनी पदोन्नती नाकारली असेल अशा अधिकाऱ्यांना पदोन्नती आदेश निर्गमित केलेला महिना संपल्यानंतर पुढील लगत महिन्याच्या कामकाजाच्या पहिल्या दिवशी कार्यमुक्त करण्यात यावे आणि पदोन्नती आदेश निर्गमित केलेल्या सांघिक कार्यालयातील अधिकाऱ्याकडे रूजू होण्याचे आदेश देण्यात यावेत. तद्नंतर, एक महिन्याच्या आत त्यांची सविस्तर पदस्थापना (मूळ परिमंडळ वगळता) इतर परिमंडळामध्ये करण्यात यावी व याचे आदेश सांघिक कार्यालयामार्फत निर्गमित करण्यात येतील. सन २०२२ मध्ये पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यांची प्रशासकीय बदली याच धोरणानुसार करण्यात यावी.

ज) उपरोक्त परिच्छेद क्र."छ" च्या धर्तीवर मंडळ व विभागीय सेवाजेष्ठता यादीमधील कर्मचाऱ्यांनी पदोन्नती नाकारली असेल, त्यांना पदोन्नती आदेश निर्गमित केलेला महिना संपल्यानंतर पुढील महिन्यातील पहिल्या कामकाजाच्या दिवशी कार्यमुक्त करण्यात यावे व पदोन्नती आदेश निर्गमित केलेल्या अधिकाऱ्याकडे हजर होण्याचे आदेश देण्यात यावेत. तद्नंतर, एक महिन्याच्या आत त्यांची सविस्तर पदस्थापना (मूळ मुख्यालय वगळता) इतरत्र करण्यात यावी.

झ) पदोन्नती नाकारल्या प्रकरणी प्रकरणपरत्वे आढावा घेण्यासाठी संचालक (संचलन), संचालक (मासं), मुख्य महाव्यवस्थापक (मासं), मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ), मुख्य महाव्यवस्थापक (विवले) व मुख्य महाव्यवस्थापक (मातं) या स्तरावर समिती गठीत करण्यात येईल व समितीचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल. तसेच मंडळ व विभागीय सेवाजेष्ठता यादीमधील कर्मचाऱ्यांनी पदोन्नती नाकारली असल्यास परिमंडळ स्तरावर मुख्य अभियंता, सहा.महाव्यवस्थापक (मासं), सहा.महाव्यवस्थापक (वित्त), कार्यकारी अभियंता (प्रशा) व सबंधीत मंडळाचे अधीक्षक अभियंता या स्तरावर समिती गठीत करण्यात यावी व समितीचा निर्णय सर्वांना बंधनकारक असेल.

ट) सन २०२३ या वर्षाकरिता प्रशासकीय विलंब टाळण्यासाठी प्रथम सांघिक कार्यालयाकडून अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आंतरपरिमंडलीय बदल्यांचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तद्नंतर परिमंडळ/मंडळ/विभाग अंतर्गच्या बदल्या संबंधीत परिमंडळ/मंडळ/विभागीय कार्यालये करतील.

ठ) प्रशासकीय परिपत्रक क्र.५१४ दि.१०.०८.२०१५ मधील व त्यानुषंगाने वेळोवळी निर्गमित केलेल्या परिपत्रके/ प्रशासकीय परिपत्रके/ मार्गदर्शक पत्रे मधील अन्य अटी व शर्ती अबाधित राहतील. तसेच कंपनीची आर्थिक परिस्थिती पाहता, सर्व साधारण बदल्या तथा विनंती बदली करिता **'बदली अनुदान'** या वर्षी देय असणार नाही.

४. सन २०२३ या वर्षाकरिताच्या सर्व बदल्या **दि.१५.०६.२०२३** पर्यंत पूर्ण करण्यात याव्यात.

५. सर्व सक्षम अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सन २०२३ मध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या बदल्या करीत असतांना बदली विषयक लागू करण्यात आलेल्या मूळ धोरणाचे, उपरोक्त बदल व तरतुदींचे तंतोतंत पालन सर्व स्तरावर होईल याची दक्षता घ्यावी.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**
१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
४) कार्यकारी संचालक (मासं)/ (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**
१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) /(माहिती तंत्रज्ञान) / मुख्य तपास अधिकारी / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व).
५) मुख्य अभियंता (महसुल व देयके), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**
१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासं-मासंव्यप्र) /(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
website : www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रचका/न.क्र.५/ № 19069

दिनांक: 23 JUN 2023

प्रति,

**१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.**

**२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.**

**३) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व).**

**विषय:- महावितरण कंपनीचे सन २०२३ करीता सुधारीत बदली धोरणाच्या मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ:-** १) शासन निर्णय क्र.एअआयव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्या१२ दि.२१.११.२०२२.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६५७ दि.२३.०५.२०२३.
३) शासन निर्णय क्र. बदली-२०२३/प्र.क्र.३२/कार्या १२ दि.३०.०५.२०२३.

महावितरण कंपनीअंतर्गत प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१४ दि.१०.०८.२०१५ अन्वये बदली धोरण स्विकारण्यात आले आहे व त्यामध्ये प्रशासनाच्या निकडीनुसार प्रथम टप्प्यात अंशत: बदल करून सन २०२३ करिता प्रशासकीय परिपत्रक क्र. ६५७ दि.२३.०५.२०२३ नुसार बदली धोरण निर्गमित करण्यात आले आहे. सन २०२३ करिता निर्गमित केलेल्या बदली धोरणामधील मार्गदर्शक सूचनांमध्ये सक्षम अधिकारी यांच्या मंजूरीनुसार खालील सूचनांमध्ये बदल करण्यात येत आहे.

क) शासन निर्णय दि.३०.०५.२०२३ च्या धर्तीवर कंपनीचे प्रशासकीय परिपत्रक क्र.६५७ दि.२३.०५.२०२३ मधील मुद्दा क्र.४ मध्ये नमूद सर्व बदल्यांकरिता दिलेली अंतिम दिनांकाला ३०.०६.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

ख) सन २०२३ या वर्षाकरिता अधिकारी व कर्मचारी यांना "बदली अनुदान" कंपनीच्या प्रचलित नियमानुसार मंजूर करावे.

ग) शासन निर्णय दि.२१.११.२०२२ च्या धर्तीवर महावितरण कंपनीत पुनर्नियुक्त माजी सैनिक असल्यास व त्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र बदली प्राधिकाऱ्याकडे सादर केल्यास त्यांची प्रशासकीय सोयीनुसार व पद उपलब्धतेनुसार त्यांच्या सोयीच्या ठिकाणी बदलीचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

२. बदली धोरणा बाबत प्रशासकिय परिपत्रक/परिपत्रक/पत्रांन्वये वेळोवेळी निर्गमित केलेल्या इतर अटी / शर्ती / सूचना अबाधित व लागू राहतील.

३. सदर पत्राद्वारे सुचित करण्यात येते की, वरील सूचना विचारात घेवून सन २०२३ या वर्षाकरिता बदल्यांबाबतची कार्यवाही पूर्ण करावी. तसेच, उपरोक्त बदलाबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत अवगत करावे.

४. सदर पत्र कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत :** शासन निर्णय दि.२१.११.२०२२ व दि.३०.०५.२०२३.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) कार्यकारी संचालक (मासं)/ (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) /(माहिती तंत्रज्ञान) / मुख्य तपास अधिकारी / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) मुख्य अभियंता, (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासं-मासंव्यप्र) /(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.